# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन

(महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१, अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

८३, मित्तल चेंबर्स, आठवा मजला, २२८, नरिमन पॉईट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी :+९१ - २२ - २२८२ ८२६२ / २२०२ ८२६१

ई-मेल : mahacim.mumbai@gmail.com संकेत स्थळ : www.mcimindia.co.in


जा. क्र. एमसीआयएम/२३०६९८२ /२०२३

दि. 20 JUN 2023

## आंतरराष्ट्रीय योग दिन

महाराष्ट्रातील सर्व आयुर्वेद व युनानी वैद्यकीय व्यावसायिक यांना,

सप्रेम नमस्कार!

गत आठ वर्षापासून 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' मोठ्या उत्साहाने साजरा होतोय हे आपणांस विदित आहेच.

योगशास्त्राच्या प्रचार-प्रसारासोबतच या निमित्ताने जगभरातील लोकांचे आयुर्वेदाप्रति आकर्षण सुद्धा वाढले आहे याचा आपण अनुभव घेतो आहोत. दि. २१ जून रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिवस हा अधिक उत्साहाने सर्वव्यापी, सर्वस्पर्शी व 'मानवतेच्या' दृष्टीकोनातून साजरा होणे म्हणजेच आपल्या दृष्टीने ही योग आणि आयुर्वेदाचा प्रचार-प्रसाराची मोठी संधी आहे. या संधीचा उपयोग करुन 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेतून समाजात योग व आयुर्वेद विषयक जनजागृती करुन आपल्या शास्त्राचे उन्नत-उत्तम सत्यस्वरुप समाजासमोर आणण्यासाठी या संधीचे आपण सोने करु या.

येत्या दि. २१ जून रोजी साजरा होणारा ९वा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' हा आपल्या सर्वांच्या आयुष्यात तन, मन, आत्मा आणि बुद्धी यांची सांगड घालणारा योगाचा समतोल घेऊन येवो. यास्तव आपणं सर्वजण दि. २१ जून रोजी मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करु या विश्वासासह...

आपला

21/06/2023

(डॉ. दिलीप उत्तमराव वांगे)
प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन,
मुंबई.